# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ २४३८ /२०१९

पुणे शहर, दिनांक ०५/०२/२०१९

**विषय :- वाहन टोईंग करणा-या हायड्रोलिक क्रेन ची चाचणी घेतले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी, शहरातील रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा होणारी वाहने,बेवारस वाहने तसेच नो-पार्कीग ठिकाणी पार्क झालेली वाहने उचलण्यासाठी वाहतूक शाखेस अद्ययावत टेम्पो,क्रेनची आवश्यकता होती, त्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला होता. त्याप्रमाणे वाहतुक शाखेस प्राप्त होणा-या क्रेनची आज रोजी चाचणी घेण्यात आली. सदरची टोईंग क्रेन ही हायड्रोलीक क्रेन असून दुचाकी वाहन अलगद उचलून क्रेनवर ठेवण्यात येत असून उचललेल्या दुचाकी वाहनाचे कोणतेही नुकसान होत नाही. तसेच उचलण्यात येणा-या वाहनांचे व्हिडीओ रेकॉर्डीग करण्याची तसेच सुचना देण्यासाठी ॲम्प्लीफायरची व्यवस्था आहे.

यापुर्वी दुचाकी वाहने ही टेम्पोवरील कर्मचारी हे हाताने उचलून टेम्पोमध्ये ठेवत होते. त्यामुळे अधिक मनुष्यबळ लागत होते व वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता असायची तसेच वाहनचालकांसोबत टेम्पोवरील कर्मचारी यांचे वादविवाद होत असायचे. नवीन प्राप्त होणा-या हायड्रोलिक टोईंग क्रेनमुळे वाहन टोईंग करणे सोईचे होणार आहे. अशाप्रकारच्या अधिक क्रेन्स् उपलब्ध होणार आहेत.